आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ ऑक्टोबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यासह देशभरात धनत्रयोदशीचा उत्साह, प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

- जीएसटीच्या दरांमध्ये केलेल्या कपातीमुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याची अटक योग्य असल्याचा बेल्जियमच्या न्यायालयाचा निर्वाळा

- नंदूरबारमध्ये रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू २८ जण जखमी

**आणि**

- चीन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिला कांस्यपदक

**<><><><><>**

राज्यासह देशभरात धनत्रयोदशीच्या सणाचा उत्साह आहे. या दिवशी धन्वंतरी, कुबेर आणि माता लक्ष्मीची पुजा केली जाते. तसंच सोन्या-चांदीची खरेदीही केली जाते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी धनत्रयोदशीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि आरोग्य राहो अशी प्रार्थना प्रधानमंत्र्यांनी केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान धन्वंतरी यांचे आशिर्वाद सर्वांवर राहोत, अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. माता लक्ष्मी आणि भगवान धन्वंतरी यांच्या आशिर्वादाने सर्वांच्या जीवनात आनंद, आरोग्य आणि प्रगतीचा दीप प्रज्वलित राहो, अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

देशातला नक्षलवाद लवकरच संपुष्टात आणणार असल्याची ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्ली इथं एका खासगी वृत्तसंस्थेनं आयोजित

केलेल्या जागतिक शिखर परिषदेत बोलत होते. आपल्या सरकारनं सुरुवातीपासूनच दिशाभूल झालेल्या तरुणांना मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी पूर्ण संवेदनशीलतेनं काम केलं आहे. त्यामुळेच आज देशात नक्षलवादानं प्रभावीत जिल्ह्यांची संख्या केवळ ११ वर आली असून, मागच्या काही दिवसांतच ३०३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड - PM MAOIST**

**<><><><><>**

जीएसटीच्या दरांमध्ये केलेल्या कपातीमुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली आहे. इलेक्ट्रॉनिक्स, वाहन आणि ग्राहकोपयोगी वस्तूंची सणासुदीच्या काळात मोठी खरेदी झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल आणि अश्विनी वैष्णव यांच्यासह नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला त्या संबोधित करत होत्या. या दरकपातीचे फायदे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदा नवरात्रीमध्ये विक्रमी संख्येनं विक्रीत वाढ झाली. गेल्या नवरात्रीच्या तुलनेत यंदा इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंची विक्री २५ टक्क्यांनी वाढल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**होल्ड - बाइट अश्विनी वैष्णव**

यंदा सणासुदीच्या काळातली उलाढाल १० टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज असून यामुळं अर्थव्यवस्थेत २० लाख कोटी रुपये अतिरीक्त येतील, असंही वैष्णव म्हणाले.

जागतिक पातळीवर अस्थिर वातावरण असताना देशाच्या आर्थिक वृद्धीचा दर मजबूत आहे. त्यामुळं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही आर्थिक वृद्धीचा अंदाज सुधारुन ६ पूर्णांक ६ दशांश टक्के केला असल्याचं पीयूष गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या लखनौ इथल्या ब्राह्मोस एअरोस्पेस युनिटमधे तयार झालेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत झालं. ब्राह्मोस हे केवळ क्षेपणास्त्र नाही तर भारताच्या वाढत्या स्वदेशी उत्पादन क्षमतेचं प्रतीक

आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. ब्राह्मोसमधे अत्याधुनिक प्रणाली असून ते लांब पल्ल्यावर मारा करू शकतं. वेग, अचूकता आणि शक्ती हे याचं वैशिष्ट्य असल्याचं संरक्षण मंत्री म्हणाले. ब्राह्मोस टीमनं नुकतेच दोन देशांशी चार हजार कोटींचे करार केल्याचं संरक्षण मंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र नौदल क्षेत्राचा पदभार रिअर ॲडमिरल शंतनू झा यांनी स्वीकारला आहे. आयएनएस कुंजली इथं काल झालेल्या समारंभात रिअर ॲडमिरल अनिल जग्गी यांच्याकडून झा यांनी पदभार स्वीकारला. राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे पदवीधर असलेले शंतनू झा यांची १ जुलै १९९३ रोजी भारतीय नौदलात नियुक्ती झाली. आय एन एस विक्रमादित्य या विमानवाहू युद्धनौकेवर त्यांनी कार्यकारी अधिकारी पद सांभाळले असून नौकानयनशास्त्र आणि दिशादर्शन यात झा तज्ज्ञ आहेत. ‘नौसेना पदक’ हा महत्वपूर्ण सन्मान शंतनू झा यांना प्राप्त झाला आहे.

**<><><><><>**

फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला भारताच्या विनंतीवरून बेल्जियम पोलिसांनी चोकसीला केलेली अटक योग्य असल्याचा निर्वाळा बेल्जियमच्या एका न्यायालयानं काल दिला. त्याच्या भारतात प्रत्यार्पणाच्या प्रक्रियेतलं हे एक मोठं पाऊल मानलं जात आहे. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणात मेहुल चोकसी आरोपी आहे. सीबीआयच्या विनंतीवरून अँटवर्प पोलिसांनी त्याला ११ एप्रिल रोजी अटक केली होती. आता ही अटक योग्य असल्याच्या निर्णयाविरोधात १५ दिवसांच्या आत बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल. त्यावर त्याचं भारतात प्रत्यार्पण होणार की नाही, हे ठरणार आहे.

**<><><><><>**

नंदुरबारच्या चांदशैली घाटात सकाळी एका खासगी वाहनाला झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २८ जण जखमी झाले आहेत. यापैकी १५ जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींवर नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अस्तंबा यात्रेहून परतत

असताना हा अपघात झाला. खासगी वाहनात चाळीसहून अधिक प्रवास करत होते, यात नंदुरबार तालुक्यातील घोटाणा, समशेरपूर, आणि नंदुरबार शहरातल्या शबरी हट्टी इथल्या रहिवाशांचा समावेश आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होणार आहे. पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २० ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यासाठी २९० उमेदवारी अर्ज आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांसाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. काँग्रेसनं आपल्या ४८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी लेनिननं वीस उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यातल्या १४ उमेदवारांनी पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. भाकप मालेनं त्यांच्या विद्यमान बारा आमदारांना पुन्हा एकदा मैदानात उतरवलं आहे.

**<><><><><>**

पत्रकाराला मारहाण केल्याप्रकरणी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांना अलिबाग जिल्हा न्यायालयाने दोषी ठरवून पाच हजार रुपये दंड ठोठावला आहे. तसंच एक वर्षाचं चांगल्या वर्तणुकीचं हमीपत्र लिहून देण्याचा आदेश दिला आहे. २०१९ च्या निवडणुकीत वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या हर्षद कशाळकर या पत्रकाराला जयंत पाटील यांनी मारहाण केली होती.

**<><><><><>**

आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी या जमातींना जात प्रमाणपत्र मिळावं, या मागणीसाठी बीड जिल्ह्यात माजलगाव इथं सहा दिवसांपासून उपोषण सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी आज उपोषणस्थळी जाऊन आंदोलकांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माजलगाव आणि बीडचे जिल्हाधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी केली.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नूकसानीपोटी ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांना ८४६ कोटी ९६ लाख रूपयांची मदत महायुती सरकारनं जाहीर केल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. दिवाळीपुर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत वर्ग करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रकाशा इथं तापी नदीकाठावरील संगमेश्वर महादेव मंदिर परिसरात दिवाळीनिमित्त आज पहाटे महाआरती झाली. मंदिर परिसरात ११ हजार दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती. याप्रसंगी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<><><><><>**

चंद्रपुरात आज स्नेहांकित दिवाळी पहाटचं आयोजन करण्यात आलं. अनेक वर्षांची परंपरा असलेल्या या कार्यक्रमाचा आज धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर रसिक प्रेक्षकांनी आस्वाद घेतला. यावेळी पार्श्वगायिका सई टेंभेकर यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला.

**<><><><><>**

चीन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिनं कांस्यपदक पटकावून इतिहास रचला. या स्पर्धेत पदक मिळवणारी ती पहिली भारतीय कंपाऊंड तिरंदाज ठरली आहे. कांस्यपदकासाठीच्या सामन्यात तिनं ग्रेट ब्रिटनच्या एला गिबसन हिच्यावर १५० विरुद्ध १४५ गुण मिळवून मात केली.

**<><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत आज दुपारी भारताच्या सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा उपांत्य फेरीचा सामना जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी या जोडीशी होणार आहे.

**//<><><><><>//**